ePaper
विदर्भातील चार मतदारसंघ 'वंचित'विना; यवतमाळ-वाशिममध्ये अर्ज बाद!



|| वर्ष - 7 | अंक - 318 || UDYAM-MH-26-0158827 ||

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**आतील पानांत**

- गुकेशचा प्रज्ञानंदवर विजय!
- सुकुमारनने केलं नेपोटीझमवर भाष्य
- राहुल गांधी राजकारणातले धोनी
- कुवतीपेक्षा जास्त झेपत नसेल तर

www.mahaenews.com | सोमवार, दिनांक 8 एप्रिल 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## विधानसभा समन्वयक देशमुखांचा राजीनामा

# खेडमध्ये महायुतीच्या वर्चस्वाला धक्का!

### » लोकसभा निवडणूक रणसंग्राम : आढळरावांच्या उमेदवारीवर नाराजीचा सूर

| पुणे | महाईन्यूज

**शिरुरमध्येआढळराव पाटलांच्या उमेदवारीमुळे महायुतीला मोठा धक्का बसण्याची शक्यता आहे. आढळराव पाटलांच्या उमेदवारीवरुन भाजपचे नेते आणि कार्यकर्त्यांनी नाराजी व्यक्त केली. त्यानंतर आता भाजपाचे नेते आणि खेड आळंदी विधानसभेचे समन्वयक अतुल देशमुख भाजपातून बाहेर पडणार आहेत. भाजपाच्या सर्व पदांचा राजीनामा देऊन आम्हीच तुम्हाला सोडतोय, अशी थेट भूमिका घेत अतुल देशमुखांचा भाजपाला रामराम ठोकणार आहे.**




### आम्हीच तुम्हाला शोधतोय...

» शिरुर लोकसभा मतदार संघाच्या महायुतीचा जाहिर मेळावा आयोजित करण्यात आला होता. मात्र या मेळाव्याला अतुल देशमुख गैरहजर होते. आढळराव पाटलांना उमेदवारी दिल्याने भाजपचे अनेक कार्यकर्ते नाराज असल्याचं दिसून येत आहे. प्रचारादरम्यानदेखील ही नाराजी दिसून आली. त्यानंतर बैठका बोलवून कार्यकर्त्यांना विश्वासात घेण्याचं काम सुरु आहे. यासाठी तातडीनं बैठका घेतल्या जात आहे. कार्यकर्त्यांना सूचना केल्या जात आहेत. मात्र अतुल देशमुख यांनी आपली नाराजी व्यक्त करुन भाजपाच्या सर्व पदांचा राजीनामा देऊन "आम्हीच तुम्हाला सोडतोय..." अशी थेट भुमिका घेत अतुल देशमुखांचा भाजपाला रामराम ठोकला आहे.

विशेष म्हणजे, अतुल देशमुख आगामी विधानसभा निवडणुकीचे गणित जुळवण्यासाठी थेट शरद पवार गटात प्रवेश करतील, असा दावा राजकीय जाणकारांनी केला आहे. तसेच, भाजपाचे नेते बाळा भेगडे व शरद बुट्टे पाटील यांना कंटाळून अतुल देशमुख यांचा राजीनामा दिल्याचे बोलले जात आहे. शिवाजी आढळराव पाटीलांच्या उमेदवारीनंतर भाजपात नाराजी सरुवाती पासून होती. मात्र ही नाराजी आता थेट राजीनाम्यापर्यंत येऊन पोहचली आहे. खेड आळंदी विधानसभेचे समन्वयक अतुल देशमुख भाजपातून बाहेर पडणार असल्याचं सांगण्यात आलं आहे. अतुल देशमुख उत्तर पुणे जिल्ह्यात भाजपाचे मोठे नेतृत्व आहे. ज्या पक्षात काम करतो तेच आपला विचार करत नसल्याची खंत व्यक्त करत देशमुखांची नाराजी व्यक्त केली आहे.

# चऱ्होली परिसरात आढळला बिबट्या!

### » नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण ; वन अधिकाऱ्यांकडून पाहणी सुरु

| पिंपरी| महाईन्यूज | प्रतिनिधी|

**चऱ्होली परिसरात शेतकऱ्यांना बिबट्याचे दर्शन झाल्यामुळे शेतकरी व नागरिकांमध्ये भितीचे वातावरण पसरले आहे. नागरिकांनी वन विभागाला या बाबत कळविल्यानंतर वन विभागाकडून सध्या पाहणी सुरू आहे. नागरिकांनी परिसरात एकट्याने न फिरण्याचे आवाहन वन विभागाने केले आहे.**



### शक्यता अन् तर्क वितर्क...

» सदर बिबट्या सलग तीन दिवस याच परिसरात आढळल्यानंतर पिंजरा लावून पकडण्यात येणार आहे. अन्यथा एका जागी न राहता बिबट्या १५ किलोमिटर लांब दुसरीकडे देखील जाण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. यापुर्वी निरगुडी, चऱ्होली मध्ये एक बिबट्या आढळला होता. तो हाच बिबट्या असण्याची शक्यता असल्याचे बोलले जात आहे.

दिघी परिसरातील साई मंदिराच्या पाठीमागील शेतामध्ये गेल्या दोन दिवसांपासून बिबट्याचा वावर असल्याचा संशय शेतकऱ्यांना होता. शेतकऱ्यांनी लावलेल्या सीसीटिव्ही मध्ये त्याबाबत तपासणी करण्या आली. या वेळी बिबट्या फिरत असल्याचे सीसीटिव्हीत निदर्शनास आले. या वेळी संबंधीत शेतकऱ्यांनी स्थानिक लोकप्रतिनिधींना या बाबत माहिती दिली. त्यांच्याकडून वन विभागाला या बाबत कळविण्यात आले. वन विभागाकडून वन परिक्षेत्र अधिकारी सुरेश वरक यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच वन अधिकारी अनिल राठोड यांचियी नेतृत्वाखाली सात ते आठ जणांच्या टीमने शेतात जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी बिबट्याच्या खुणा आढळून आल्याने निदर्शनास आले.

वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी बिबट्याला ट्रॅप करण्यासाठी सध्या शेतामध्ये कॅमेरे लावले आहेत. रविवारी (दि. ७) संध्याकाळी त्या बाबत तपासणी केली जाणार आहे. त्यासाठी वन विभागाचे अधिकारी, कर्मचारी रात्रभर थांबणार आहेत. संबंधीत बिबट्या रात्री १० नंतर शेतात येत असल्याचा प्राथमिक अंदाज वन विभागाकडून वर्तविण्यात येत आहे. दिवसभर उन्हामुळे गारव्यात जाऊन बसत आहे. रात्री बिबट्या बाहेर येत असल्याचे वन विभागाकडून सांगण्यात येत आहे. त्यावर लक्ष ठेवून पुढील कार्यवाही करण्यात येणार असल्याचे वन विभागाकडून सांगण्यात येत आहे.

# पुण्यात भाजपाची व्युहरचना!

## चंद्रकांत पाटील : अडीच लाख घरं, दहा लाख मतदार अन् दहा हजार कार्यकर्ते!

**। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**आगामी लोकसभा निवडणुकीत महायुतीकडून भाजपचे माजी महापौर मुरलीधर मोहोळ यांना उमेदवारी दिली आहे. यातच पुणे लोकसभेसह जिल्ह्यातील सर्व लोकसभा मतदारसंघाची जबाबदारी राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्याकडे जबाबदारी देण्यात आलीय.**

यातच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हात बळकट करण्यासाठी आणि मुरलीधर मोहोळ यांना विजयी करण्यासाठी चंद्रकांत पाटलांनी भाजपची व्युहरचना आज पत्रकारांशी बोलतांना सांगितली आहे. मतदारांच्या घरी प्रत्यक्ष जाण्यासाठी भाजपने मोठी योजना आखली आहेत. त्याबाबत ते बोलत होते. यावेळी चंद्रकांत पाटील म्हणाले की, प्रत्येक घरी चार मतदार असतील तर दहा लाख मतदाराला एका दिवशी संपर्क करण्याची महत्वकांक्षी योजना आखली आहे. ती व्यवहारात आणणं ही प्रत्येकाची जबाबदारी असून आजच मी श्याम देशपांडे यांच्या घरी गेलो. श्याम देशपांडे यांनी अगोदरच पंचवीश घरांना भेटी दिल्या आहेत. माझ्यासह मुरलीधर मोहोळ देखील २५ घरांना भेटी देणार आहेत. अडीच लाख घरं, दहा लाख मतदार



आणि दहा हजार कार्यकर्ते असा त्याचा रेशीओ असणार आहे. पुढे बोलतांना चंद्रकांत पाटील म्हणाले की, निवडणुकीपुर्वी आम्ही संघटनात्मक रचना बांधून घेतली आहे. एकवीशे बुधवर तीस जणांची समिती स्थापन करून प्रत्येकाला एका पानांवरील पाच कुटुंबांची जबाबदारी देण्यात आली आहे. यातच पुण्यातील सहा विधानसभा मतदारसंघातील सर्वपक्षीय नेत्यांची दोन दोन तासाच्या बैठका घेतल्या आहेत. ज्याठिकाणी समन्वयकांनी समन्वय साधला पाहिजे. यातच आठ नगरसेवकांचा दोन प्रभाग अशा प्रकारे बैठकाही घेतल्या आहेत. त्यानंतर प्रभागनिहाय बैठक घेऊन त्यालाही मोठी संख्येने लोक उपस्थित होते. यामध्ये ३३ प्रभाग येतात. त्यामध्ये हजार बाराशे असे समन्वय येतात. कॉलनी मीटिंग असे सुक्ष्म पद्धतीने नियोजन लोकसभा निवडणुकीसाठी करण्यात आले असल्याचेही त्यांनी सांगितले.

### महायुती एकसंघ राहण्यासाठी प्रयत्न...

» महायुती एकसंघ राहावी यासाठी पुणे जिल्ह्यातील चार लोकसभा मतदारसंघात तसेच पुणे लोकसभेतील सहा विधानसभा मतदारसंघात बैठका घेतल्या. यात काही वाद असेल तर तो दुर करण्याचा प्रयत्न केला. यातच प्लॅक्सवरून ज्या काही काहाण्या समोर येत आहेत. त्यावर सगळ्यांना हात जोडून विनंती केली की आपण महायुतीत आहोत. त्यामुळे याची काळजी सगळ्यांनी घ्यावी. सहा एप्रिल रोजी हा भाजपचा स्थापना दिवस होता. त्यानंतर भाजपच्या सर्व नेत्यांनी आपापल्या घरी भाजपचा झेंडा लावला आहे. आज रवीवार सोयीचा म्हणून भाजपच्या दहा हजार कार्यकर्त्यांनी प्रत्येकी २५ घरं केल्याशिवाय घरी जायचं नाही. असेही कार्यकर्त्यांना सुचना दिल्याचे चंद्रकांत पाटलांनी सांगितले.

# आढळराव पाटील काम करणारा माणूस!

## आ. अतूल बेनके : जुन्नरमधून चांगले मताधिक्य मिळणार

**। भोसरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**सलग तीन वेळा प्रतिनिधित्व केल्यानंतर मागच्या निवडणुकीत माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटलांना पराभावाचा सामना करावा लागला होता. तरीही देखील आढळराव पाटलांनी आपल्या मतदारसंघात आपलं काम सुरू ठेवलं. यातच आता राज्यात पक्ष फुटीनंतर निर्माण झालेल्या राजकीय समीकरणांमध्ये आढळरावांना अजित पवारांच्या राष्ट्रवादीकडून तिकीट देण्यात आलं आहे. यामुळे आता अजितदादांची सगळी नेतेमंडळी आढळरावांच्या विजयासाठी जोमाने कामाला लागली आहे.**

शिरूर लोकसभा



मतदारसंघातून बाहेरून आलेल्या नेत्याला तिकीट देऊ नये अशी भूमिका अजितदादांच्या नेत्यांनी घेतली होती.

मात्र अजितदादांनी सगळ्यांशी चर्चा करून त्यांची नाराजी दुर करत आढळरावांसाठी काम करण्याचा आदेश दिला. त्यानंतर सगळेच नेते आता झपाटून कामाला लागले आहेत. यातच एक दिवसापुर्वी आढळरावांनी विलास लांडे यांची भेट घेतली. त्यानंतर विलास लांडे देखील प्रचाराच्या मैदानात उतरले आहेत. अशातच आता जुन्नर विधानसभा मतदारसंघातून शिवाजीदादांनी सर्वाधिक मत पडणार असा विश्वास आमदार अतुल बेनके यांनी व्यक्त करून दाखवला आहे. यावेळी अतुल बेनके म्हणाले की, जुन्नर तालुक्यातील तमाम नागरिक शिवाजीदादांच्या पाठीशी उभे राहतील. तीन पक्ष एकत्र असल्यामुळे जुन्नर तालुक्यातून अधिकतर मते शिवाजीदादांना पडतील. शिवाजी आढळराव पाटील हा काम करणारा माणूस आहे, त्यामुळे ते शंभर टक्के शिरूर लोकसभेतून विजयी होणार आहेत. असा विश्वास देखील त्यांनी व्यक्त केलाय.

### चुरशीची लढत होण्याची शक्यता...

» दरम्यान, दुसऱ्या बाजूला महाविकास आघाडीकडून विद्यमान खासदार अमोल कोल्हे यांना पुन्हा संधी देण्यात आलीय. अमोल कोल्हे यांनी देखील आपल्या प्रचाराला सुरूवात करून दिली आहे. दोन्ही उमेदवार सध्या शिरूर लोकसभा मतदारसंघात नेत्यांच्या गाठीभेटी घेतांना दिसत आहेत. त्यामुळे अमोल कोल्हे दुसऱ्यांदा खासदार होणार का की शिवाजी आढळराव पाटील कोल्हेंना चितपट करणार ते पाहणं महत्वाचं ठरणार आहे.

# विमाननगर भागातून अपहरण झालेल्या महाविद्यालयीन तरुणीचा मित्राकडूनच खंडणीसाठी खून

**। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

विमाननगर भागातून अपहरण झालेल्या महाविद्यालयीन तरुणीचा खून झाल्याची धक्कादायक घटना रविवारी रात्री उशीरा उघडकीस आली. अभियांत्रिकी शाखेतील तरुणीचा खून तिचा मित्राने साथीदारांच्या मदतीने केला असून, तिचा मृतदेह सुपे गावाजवळ पुरल्याचे उघडकीस आले.

भाग्यश्री सूर्यकांत सुडे (वय २२ ) असे खून झालेल्या तरुणीचे नाव आहे. याप्रकरणी शिवम फुलावळे, सागर जाधव, सुरेश इंदुरे यांना अटक करण्यात आली. याबाबत भाग्यश्रीचे वडील सूर्यकांत ज्ञानोबा सुडे (वय ४९, रा. हरंगुळ बुद्रुक, जि. लातूर) यांनी विमाननगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. सूर्यकांत यांची मुलगी भाग्यश्री वाघोलीतील एका अभियांत्रिकी महाविद्यालायत शिक्षण घेत होती. ३० मार्च रोजी सायंकाळी तिने आईच्या मोबाइलवर संपर्क साधला होता. तेव्हा मैत्रिणीच्या वाढदिवसासाठी विमाननगरमधील फिनिक्स मॉलमध्ये जाणार असल्याचे तिने आईला सांगितले




होते. त्यानंतर ३१ मार्च रोजी तिच्या मोबाइल क्रमांकावर संपर्क साधण्यात आला. तेव्हा मोबाइल क्रमांक बंद असल्याचे लक्षात आले.

तिच्या कुटुंबीयांनी ती बेपत्ता झाल्याची तक्रार विमानतळ पोलीस ठाण्यात दिली होती. त्यानंतर २ एप्रिल रोजी मुलीच्या मोबाइल क्रमांकावर संदेश आला. तुमच्या मुलीचे अपहरण करण्यात आले आहे. मुलीची सुखरूप सुटका करण्यासाठी तातडीने नऊ लाख रुपये द्या. अन्यथा मुलीचे बरेवाईट करू, असे संदेशात म्हटले होते. भाग्यश्रीच्या वडिलांनी या बाबतची माहिती पोलिसांनी दिल्यानंतर अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला.

विमानतळ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक आनंदराव खोबरे, गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सर्जेराव कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक निरीक्षक सचिन धामणे, उपनिरीक्षक चेतन भोसले यांनी तपास सुरू केला.

# उमेदवार नव्हे; पाडणारे बना!

## मनोज जरांगे यांचे आवाहन : मराठा आरक्षणाचा बाजी घेणाऱ्यांच्या बाजुने रहा

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**उमेदवार होण्यापेक्षा पाडणारे बना, त्यात मोठा विजय आहे, असे आवाहन मनोज जरांगे यांनी मराठा बांधवांना केले आहे. मनोज जरांगे हे पिंपरी-चिंचवडमध्ये पत्रकारांशी बोलत होते. सगेसोयऱ्यांचा निर्णय घेईल त्या व्यक्तीच्या बाजूने रहा, असे देखील आवाहन जरांगे यांनी केले.**





मनोज जरांगे म्हणाले, मराठा समाजामध्ये शंभर टक्के रोष आहे. तो या निवडणुकीत नक्कीच दिसेल. आमचा मार्ग हा राजकीय नाही. आम्हाला आरक्षण महत्त्वाचे आहे. त्यामुळे आम्ही कुठेही उमेदवार दिला नाही, किंवा कुठल्या पक्षाला पाठिंबा दिला नाही. ही निवडणूक मराठा समाज आपल्या हातात घेईल आणि ज्याला पाडायच आहे, त्याला नक्कीच पाडेल. पुढे ते म्हणाले, मला बाजूला करण्यासाठी गृहमंत्र्यांनी अनेक प्रयत्न केलेत. परंतु, मी बाजूला झालो नाही. सध्या महाराष्ट्रात खोटे गुन्हे दाखल करण्याचे काम सुरू आहे. आमिश दाखवून माणसं फोडली जात आहेत. हे सर्व सरकारला जड जाईल, असा इशारा त्यांनी दिला. सहा जूनपर्यंत मराठा समाजाला आरक्षण न मिळाल्यास विधानसभा काबीज करणार असल्याचे देखील जरांगे यांनी म्हटले. पुढे ते म्हणाले, प्रकाश आंबेडकर यांच्यासोबत आमचा संपर्क नाही. आमची मनं एक आहेत. दोन मन होऊ शकत नाही. कोणाला निवडून आणायचं हे समाज ठरवेल. पण एक लक्षात ठेवा, आई बहिणीच्या अंगावरील व्रण समाजाने विसरू नये. महायुती असेल किंवा महाविकास आघाडी असेल, यांनी मराठा समाजाला काही दिलेलं नाही. जो सगेसोयऱ्यांचा निर्णय घेईल त्याच्या बाजूने रहा, असेही जरांगे म्हणाले.

### जागावाटपचा निर्णय लवकरच होईल : अजित पवार

काही जागा ठरवण्याबाबत विलंब लागतो. आघाडी असो किंवा महायुती, काही जागा निश्चित करण्यामध्ये उशीर लागत असतो. पण, लवकरच याबाबत निर्णय होईल, असे अजित पवार यांनी स्पष्ट केले. पिंपरी- चिंचवडमध्ये थेरगाव येथे खासगी रुग्णालयाच्या उद्घाटनासाठी आले असता ते पत्रकारांशी बोलत होते. उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या तारखेपर्यंत जागा वाटपाचा तिढा सुटेल, अशी मिश्किल टिप्पणीही अजित पवार यांनी केली. प्रवीण माने हा मूळचा माझाच कार्यकर्ता असल्याचं सांगत माने यांच्या अजित पवार गटातील प्रवेशाला अजित पवार यांनी एक प्रकारे दुजोराच दिला. मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्यासाठी महायुतीतील सर्वजण घड्याळ धनुष्यबाण आणि कमळ या चिन्हावरील उमेदवारांच्या विजयासाठी प्रयत्न करतील, असंही ते म्हणाले. एकनाथ खडसे यांच्या भाजप प्रवेशाच्या वृत्तावर बोलताना त्यांचे बरेच दिवस घालमेल सुरू होती, आता त्यांना निर्णय घ्यावेसे वाटले असेल, असेही ते म्हणाले.

---

# रहाटणीमध्ये महाविकास आघाडीची 'वज्रमूठ'

## आमदार शशिकांत शिंदे : वाघेरेंसारखा विनम्र माणूस निवडून द्या!

। पिंपरी ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**संघर्षाच्या काळात आणि अघोषित आणीबाणीच्या विरोधात ही मोठी लढाई आहे. अधिकाऱ्यांचा गैरवापर करून पक्ष फोडले, नेते फोडले. तरी सामान्य कार्यकर्ता इतिहास घडवल्याशिवाय राहणार नाही. चेहऱ्यावर नम्रता व विनम्रपणे बोलणारा माणूस अशी ओळख महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांची आहे. मावळ लोकसभेत येत्या १३ मे रोजी मशाल या चिन्हासमोरील बटण दाबून संजोग वाघेरे पाटील यांच्यासारखा चांगला माणूस निवडून देवू. महाराष्ट्र हा छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वाभिमानी विचार दाखवून देण्याची हीच वेळ आहे, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे माजी मंत्री तथा आमदार शशिकांत शिंदे यांनी महाविकास आघाडीच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांना आज, रविवारी केले..**




मावळ लोकसभा महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांच्या प्रचारार्थ रविवारी (दि. ७ एप्रिल) रहाटणीत आयोजित महाविकास आघाडीच्या मेळाव्यात ते बोलत होते. या मेळाव्यासाठी शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) संपर्कप्रमुख तथा आमदार सचिन अहिर, माजी आमदार ॲड. गौतम चाबुकस्वार, स्वराज इंडियाचे नेते मानव कांबळे, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते मारुती भापकर, राष्ट्रवादी काँग्रेस – शरदचंद्र पवार शहराध्यक्ष तुषार कामठे, विद्यार्थी प्रदेशाध्यक्ष सुनील गव्हाणे, महिला शहराध्यक्षा ज्योति निंबाळकर, युवक शहराध्यक्ष इम्रान शेख, काँग्रेस पदाधिकारी गौतम अरगडे, महिला शहराध्यक्षा सायली नढे, माजी नगरसेविका सुलक्षणा शिलवंत-धर, मीनल यादव, आम आदमी पार्टीचे पदवीधर प्रदेशाध्यक्ष चेतन बेंद्रे, शहराध्यक्ष मीना जावळे, शहरप्रमुख ॲड. सचिन भोसले, मावळ लोकसभा प्रचार प्रमुख योगेश बाबर आदी उपस्थित होते.

शशिकांत शिंदे पुढे म्हणाले, "मराठा, ओबीसी, धनगर समाजाला खेळवत ठेवण्याचे काम सरकारने केले. तरुणांची फसवणूक सरकारने केली. म्हणूनच ८४ वर्षाच्या योद्धाला तरुण साथ देतात. ही लढाई सोपी नाही. संघर्षाच्या काळात उद्धव ठाकरे साहेबांनी घेतलेला निर्णय हा खऱ्या अर्थाने बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांप्रमाणे लढणारा विचार आहे. ७ तारखेला मी मोकळा झाल्यानंतर मावळमध्ये संजोग वाघेरे मी तुमच्याबरोबर आहे. एका विचाराचे कार्यकर्ते म्हणून हा माणूस निवडून आला पाहिजे, हा संकल्प घेऊन इथून बाहेर जावू".

### संविधान वाचवण्यासाठी लढा : तुषार कामठे

तुषार कामठे म्हणाले, "भाजप चुकीच्या प्रचारात गुंतवून ठेवत आहे. भाजप देशात दोनशे पार जाणार नाही. सुप्रियाताई सुळे, अमोलजी कोल्हे यांच्यासोबत मावळमधून संजोग वाघेरे पाटील यांना लोकसभेत पाठवू, हा निश्चय प्रत्येक कार्यकर्त्याने केलेला आहे. पवार साहेब व उद्धव साहेब यांच्यासोबत लढायला आम्ही तयार आहोत. स्वाभिमानी जनता आणि कार्यकर्ता गद्दार व धोका देणाऱ्यांना आता बळ देणार नाही". मानव कांबळे म्हणाले, "प्रत्येक कार्यकर्त्याला मतदारांपर्यंत पोहोचायचे. संविधान वाचविण्यासाठी, महिला, तरुण, गरिबांच्या, शेतकऱ्यांसाठी संजोग वाघेरे म्हणजे आपण स्वतः उमेदवार आहोत. हे समजून ही लढाई लढायची असून संजोग वाघेरेंना निवडून देण्याचे काम करावे लागेल".




# घटनात्मक नैतिकता पणाला..!

**एखाद्या मुख्यमंत्र्याला पदावर असताना भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली अटक होणे हा कायदेशीर, राजकीय आणि घटनात्मक मुद्दा तर आहेच, मात्र हा प्रश्न त्याही पलीकडे जातो. तो घटनेतील शब्दांच्या पलीकडे जाऊन घटनात्मक नैतिकतेवर बोट ठेवतो.**

या प्रश्नाचा तथाकथित 'तथ्यां'च्या आधारे विचार करूया. लाच देणाऱ्यांवर वरदहस्त ठेवण्याच्या मोबदल्यात लाच मागण्यात आली, असा आरोप मुख्यमंत्र्यांवर करण्यात आला आहे. या क्षणी एवढेच म्हणता येईल की 'भ्रष्टाचार केल्याचा आरोप होणे' म्हणजे 'गुन्हा सिद्ध होणे' नव्हे. 'जोवर आरोप सिद्ध होत नाही, तोवर व्यक्ती निरपराध आहे, असे गृहीत धरले जावे' हे फार पूर्वीपासून पाळले गेलेले विधिग्राह्य तत्त्व आहे.त्यामुळे, या प्रकरणाच्या कायदेशीर बाजूचा विचार निर्दोषत्व गृहीत धरून सुरू करूया.. एक व्यक्ती एका राजकीय पक्षाची सदस्य आहे. हा राजकीय पक्ष निवडणुका लढवितो आणि पक्षाचे सदस्य विधानसभेच्या सर्वाधिक जागा जिंकतात. विधिमंडळ पक्ष एका व्यक्तीला आपला नेता म्हणून निवडतो. राज्यपाल त्या व्यक्तीला मुख्यमंत्रीपदाची शपथ देतात. मुख्यमंत्री आणि त्यांचे मंत्रिमंडळ पदभार स्वीकारते आणि नवे सरकार स्थापन होते. हा सारा घटनाक्रम सर्वांना परिचित आहे आणि गेल्या ७५ वर्षांत त्याची शेकडो वेळा पुनरावृत्ती झाली आहे. हा सारा घटनाक्रम वेस्टमिन्स्टर तत्त्वावर



(राजकीय आयाम) आणि घटनेतील तरतुदींवर (घटनात्मक आयाम) आधारित आहे.मुख्यमंत्र्यांना त्यांची कर्तव्ये पार पाडण्याचे स्वातंत्र्य असले पाहिजे, हे तर गृहीतच आहे. त्यांनी राज्यपालांना सल्ला देणे, कॅबिनेटच्या बैठका घेणे, जनतेची मते आणि त्यांच्यापुढील समस्या जाणून घेणे अपेक्षित आहे. त्यांनी विधानसभेत बोलणे आणि इतर आमदारांचे म्हणणे ऐकणे, विधेयके आणि प्रस्तावांवर मतदान करणे अशी सर्व कर्तव्ये बजावणे गरजेचे आहे. आपली शासकीय व्यवस्था नोंदी आणि नस्तींवर आधारित असल्यामुळे प्रत्येक गोष्ट लिखित स्वरूपात आणि स्वाक्षरी केलेली असणे अत्यावश्यक आहे. साहजिकच जी व्यक्ती मुक्त नाही ती मुख्यमंत्र्याची ही सर्व कर्तव्ये पार पाडूच शकत नाही. एखाद्या कार्यरत मुख्यमंत्र्याला पायउतार होण्यास भाग पाडण्याचे किंवा त्याला पदच्युत करण्याचे अनेक मार्ग आहेत. एक मार्ग आहे निवडणुकीचा. ज्याद्वारे दर पाच वर्षांनी किंवा त्यापेक्षा कमी कालावधीत होणाऱ्या निवडणुकांत मुख्यमंत्र्यांचा आणि त्यांच्या पक्षाचा पराभव करता येऊ शकतो. दुसरा आहे संसदीय मार्ग. ज्याद्वारे विधानसभेत अविश्वास ठराव संमत करून, वित्तविधेयक फेटाळून किंवा एखादा धोरणात्म प्रस्ताव फेटाळून मुख्यमंत्र्यांना पायउतार होण्यास भाग पाडले जाऊ शकते. यापैकी कोणत्याही परिस्थितीत बहुमताचा विजय होतो. याव्यतिरिक्तही राजकीय पक्षांनी मुख्यमंत्र्यांना पदावरून दूर करण्यासाठी काही कुटिल मार्ग शोधून काढले आहेत. 'ऑपरेशन लोटस' हा असाच एक शोध आहे. याअंतर्गत सत्ताधारी पक्षाच्या ठरावीक आमदारांना राजीनामा देण्यास किंवा अन्य पक्षात प्रवेश करण्यास प्रवृत्त केले जाते. अशा रीतीने सत्ताधारी पक्षाला विधानसभेत अल्पमतात आणले जाते.दहाव्या परिशिष्टाअंतर्गत फुटीरांना अपात्र ठरविले जाऊ शकते, मात्र दहावे परिशिष्टाचे बिनदिक्कत उल्लंघन केले जाते. मुख्यमंत्र्याला पायउतार होण्यास भाग पाडण्याचे अन्यही काही मार्ग आहेत का? मला तरी अन्य कोणताही मार्ग दिसत नाही, मात्र काही चलाख व्यक्ती आहेत. त्यांनी एखाद्या मुख्यमंत्र्यावर बंधन आणण्याचा वरवर पाहता कायदेशीर भासेल, असा मार्ग शोधून काढला आहे. मुख्यमंत्र्याविरोधात एफआयआर किंवा एन्फोर्समेंट केस इन्फॉर्मेशन रिपोर्ट (ईसीआयआर) दाखल करा, त्यांना चौकशीसाठी समन्स बजावा आणि अटक करा. यात सीबीआय थोडी तरी सावध भूमिका घेते, मात्र सक्तवसुली संचालनालय (ईडी) मात्र फारच निढवलेले आहे.अखेरीस जामीन मंजूर वा नामंजूर करणारा सर्वोच्च न्यायालयाचा आदेश ही सर्व प्रक्रिया पूर्ण केली जावी, असा दावा केला जातो. हे सर्व होत असताना सरकारकडे मात्र असाहाय्यपणे वाट पाहण्याशिवाय काहीही मार्ग नसतो. ते कधीही कोसळेल अशा डळमळीत स्थितीत असते. पक्षाच्या अन्य एखाद्या नेत्याने मुख्यमंत्र्यांची जागा घेतल्यास त्यालाही अशाच प्रकारे अटक होण्याची भीती वाटत राहते. मुख्यमंत्री पदासाठी एकापाठोपाठ एक उमेदवार देत राहण्याएवढी ऊर्जा कोणत्याही राजकीय पक्षाकडे असणे शक्य नाही.

## संपादकीय »

# येणारे संकट


***संकटाची तीव्रता कमी करायची असेल तर त्यासाठी निवडणुकीइतकी प्रभावी मात्रा दुसरी नसते.***

कोणत्याही संकटाची तीव्रता कमी करायची असेल तर त्यासाठी निवडणुकीइतकी प्रभावी मात्रा दुसरी नसते. सध्या महाराष्ट्रात तसेच दिसते. राज्यातील सत्ताधारी महायुती, विरोधी महाआघाडी यांच्यातील सुंदोपसुंदीच्या गदारोळात राज्यकर्ते आणि प्रशासन यांच्या गावीच दुष्काळ नाही. काही धोरणात्मक निर्णय, थातूरमातूर उपाययोजना, केंद्राकडे पाठपुरावा यापलीकडे काहीही घडलेले नाही. लोकसभेची आचारसंहिता लागण्यापूर्वीच्या मंत्रिमंडळाच्या बैठकांमधून मतदारांवर प्रभाव टाकणारे डझनावारी निर्णय घेतले, परंतु त्यात दुष्काळी उपाययोजना नव्हत्या. परिणामी, दुष्काळाचे संकट त्याच्या गतीने पुढे सरकतच आहे. दुष्काळावर उपाययोजनांसाठी प्रशासकीय यंत्रणेने कंबर कसून कामाला लागले पाहिजे. एप्रिलचे तीन आठवडे, संपूर्ण मे आणि पावसाने ओढ दिल्यास जून महिना असा मोठा कालावधी पाणीप्रश्न, दुष्काळामुळे बिकट असेल.

आपल्या रिझर्व्ह बँकेची नुकतीच नव्वदी झाली. 'लोकसत्ता'नं त्यावर संपादकीय लिहिलं. त्यात आपले चिंतामणराव देशमुख, आय जी पटेल, मनमोहन सिंग, सुब्बा राव, वाय व्ही रेड्डी, रघुराम राजन, ऊर्जित पटेल असे एकापेक्षा एक बुद्धिमान जे रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर होऊन गेले त्यांच्या मोठेपणाचा धावता उल्लेख होता.

# आपल्या रिझर्व्ह बँकेची नुकतीच नव्वदी झाली

संपादकीयावर खूप प्रतिक्रिया आल्या. एका वर्गाची प्रतिक्रिया अपेक्षित अशी होती. म्हणजे... "तुम्ही ठरावीकांचाच उल्लेख केलात", "त्यांच्याइतकेच चांगले आणखीही काही होते वा आहेत, पण त्यांचा उल्लेख करण्याचं औदार्यही दाखवलं नाहीत," वगैरे वगैरे.या अशा तक्रार करणाऱ्यांना कसला न्यूनगंड असावा बहुधा. ते सतत असे कण्हतात. त्यांच्यात आज्ञाधारकता हा खूप म्हणजे खूप मोठा गुण मानतात. आणि कोणाला चांगलं म्हणायचं याचाही 'आदेश' येतो. तो आला की वेगळा काही विचार करायचा नाही. त्याचे गोडवे गायचे आणि जे ते गायला नकार देतात त्यांना ट्रोल करायलाही सांगितलं जात असेल बहुधा. असो. तो काही मुद्दा नाही. पण या आलेल्या प्रतिक्रियांमुळे एक प्रश्न मात्र चर्चिला जायला हवा. चांगला, कणखर नियामक कोणाला म्हणायचं? किंवा एखादा नियामक चांगला कधी ठरतो? रिझर्व्ह बँक ही आपल्या देशातल्या बँकिंग क्षेत्राची प्रमुख नियामक.



बँकिंग क्षेत्रातला शेवटचा शब्द. आणि त्याचा अधिकार फक्त रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरला. अन्य कोणत्या बँका खासगी असोत वा सरकारी. रिझर्व्ह बँकेनंतर त्यांच्यासाठी ही त्यांची सर्वोच्च संस्था आणि रिझर्व्ह बँकेचा गव्हर्नर हा बँकिंग क्षेत्राचा रक्षणकर्ता. पहिल्या परिच्छेदात उल्लेखलेल्या महानुभावांनी आपापल्या काळात बँकिंग क्षेत्राच्या रक्षणार्थ कडक भूमिका घेतल्यात, प्रसंगी सरकारशी दोन हात केलेत. म्हणून त्यांचा(च) उल्लेख! त्यांचा गौरव करताना एक गोष्ट सांगायला हवी... तर झालं असं की रिझर्व्ह बँकेनं २०१३ सालच्या फेब्रुवारीत एक आदेश काढला खासगी बँकांबाबत. त्यानुसार या खासगी बँकांच्या प्रवर्तकांची बँकेतली मालकी तिच्या स्थापनेनंतर १२ वर्षांत १५ टक्क्यांवर असता नये. बँक सुरू करताना त्यांची भले ५०-६० टक्के मालकी त्या बँकेत असेल. पण बँक सुरू झाल्यानंतर, चालू लागल्यानंतर १२ वर्षांनी ही मालकी १५ टक्के इतपतच असायला हवी. याचा अर्थ प्रवर्तकानं या काळात आपली अतिरिक्त मालकी विकून टाकायला हवी किंवा अन्य कोणाकडे वर्ग करायला हवी. एका खासगी बँकेनं काही हा आदेश मनावर घेतला नाही. असतात असे स्वत:ला इतरांपेक्षा 'वरचे' समजणारे! तर हा आदेश आपल्याला लागू होतो किंवा नाही यावर ही खासगी बँक आणि रिझर्व्ह बँक यांच्यात बरीच वर्षं पत्रापत्री सुरू होती. चाळीसेक पत्रं लिहिली/ उत्तरली गेली असतील. रिझर्व्ह बँक काही आपला मुद्दा सोडायला तयार नव्हती. ही या बँकेची कौतुकाची बाब.

त्यामुळे अखेर २०१८ साली या खासगी बँकेच्या प्रवर्तकानं ठरवलं आपली या बँकेतली मालकी कमी करायची.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

\- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# कुवतीपेक्षा जास्त झेपत नसेल तर

## खासदार श्रीकांत शिंदे यांचा आदित्य ठाकरेंवर निशाणा

। सोलापूर । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कल्याण लोकसभेसाठी खासदार श्रीकांत शिंदे यांची उमेदवारी जाहीर केली. यानंतर शिवसेना ठाकरे गटाने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार श्रीकांत शिंदे यांच्यावर निशाणा साधला होता.**



आमचेही तसेच काही अनुयाबाबत आमदार आदित्य ठाकरे यांनी श्रीकांत शिंदे यांच्यावर टीका करताना कल्याणची जागा मिळविण्यासाठी सोबत असलेल्या पाच जणांचा बळी द्याला लागेल, असा टोला लगावला होता. आदित्य ठाकरे यांच्या या टीकेला आता श्रीकांत शिंदे यांनी प्रत्युत्तर दिले आहे."ज्याची जी कुवत आहे, त्या प्रमाणे वक्तव्य केले पाहिजेत. आपल्या कुवतीपेक्षा जास्त वक्तव्य झेपत नसतील तर करू नका", असे प्रत्युत्तर श्रीकांत शिंदे यांनी आदित्य ठाकरे यांना दिले. आज राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडून डोंबिवलीत पदाधिकारी मेळावा आयोजित करण्यात आला होता. यावेळी माध्यमांशी बोलताना श्रीकांत शिंदे यांनी ठाकरे गटावर टीका केली. श्रीकांत शिंदे म्हणाले, "कल्याण लोकसभा मतदारसंघात आज कल्याण पूर्व, कल्याण ग्रामीण आणि डोंबिवली या सर्व विधानसभा मतदारसंघातील प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादीचा मेळावा संपन्न झाला. या मतदारसंघात राष्ट्रवादीची ताकद मोठ्या प्रमाणात आहे. याआधी शिवसेना, आरपीआय, भाजपा अशी युती होती. पण आता त्यामध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटही सहभागी आहे. त्यामुळे महायुतीमधील सर्व पक्षाची ताकद आम्हाला मिळाली आहे. भविष्यात या महायुतीच्या माध्यमातून कल्याण लोकसभेला मताधिक्याचा एक वेगळा रेकॉर्ड होईल", असे श्रीकांत शिंदे यांनी म्हटले.कल्याण लोकसभा मतदारसंघात भाजपाचा उमेदवार देण्यात यावा, अशी मागणी पक्षाच्या कार्यकर्त्यांची होती. श्रीकांत शिंदे यांच्या उमेदवारीला भाजपाच्या कार्यकर्त्यांचा विरोध असल्याची चर्चा होती. यामुळे कल्याण लोकसभा मतदारसंघाच्या उमेदवाराची घोषणा लवकर होत नसल्याचे बोलले जात होते. अखेर यावर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कल्याणमधील महायुतीचे शिवसेनेचे खासदार श्रीकांत शिंदे हेच उमेदवार असतील असे शनिवारी सांगितले. आदित्य ठाकरे यांच्या या टीकेला आता श्रीकांत शिंदे यांनी प्रत्युत्तर दिले आहे."ज्याची जी कुवत आहे, त्या प्रमाणे वक्तव्य केले पाहिजेत. आपल्या कुवतीपेक्षा जास्त वक्तव्य झेपत नसतील तर करू नका", असे प्रत्युत्तर श्रीकांत शिंदे यांनी आदित्य ठाकरे यांना दिले. आज राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडून डोंबिवलीत पदाधिकारी मेळावा आयोजित करण्यात आला होता. यावेळी माध्यमांशी बोलताना श्रीकांत शिंदे यांनी ठाकरे गटावर टीका केली. श्रीकांत शिंदे म्हणाले, "कल्याण लोकसभा मतदारसंघात आज कल्याण पूर्व, कल्याण ग्रामीण आणि डोंबिवली या सर्व विधानसभा मतदारसंघातील प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादीचा मेळावा संपन्न झाला. या मतदारसंघात राष्ट्रवादीची ताकद मोठ्या प्रमाणात आहे.

### पाच जणांचा बळी द्यायला लागेल

» याआधी शिवसेना, आरपीआय, भाजपा अशी युती होती. पण आता त्यामध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटही सहभागी आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कल्याण लोकसभेसाठी खासदार श्रीकांत शिंदे यांची उमेदवारी जाहीर केली. यानंतर शिवसेना ठाकरे गटाने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार श्रीकांत शिंदे यांच्यावर निशाणा साधला होता. आमचेही तसेच काही अनुयाबाबत आमदार आदित्य ठाकरे यांनी श्रीकांत शिंदे यांच्यावर टीका करताना कल्याणची जागा मिळविण्यासाठी सोबत असलेल्या पाच जणांचा बळी द्याला लागेल, असा टोला लगावला होता. आदित्य ठाकरे यांच्या या टीकेला आता श्रीकांत शिंदे यांनी प्रत्युत्तर दिले आहे."ज्याची जी कुवत आहे, त्या प्रमाणे वक्तव्य केले पाहिजेत. आपल्या कुवतीपेक्षा जास्त वक्तव्य झेपत नसतील तर करू नका", असे प्रत्युत्तर श्रीकांत शिंदे यांनी आदित्य ठाकरे यांना दिले. आज राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडून डोंबिवलीत पदाधिकारी मेळावा आयोजित करण्यात आला होता. यावेळी माध्यमांशी बोलताना श्रीकांत शिंदे यांनी ठाकरे गटावर टीका केली.

---

# खडसे यांना भाजपाने खोट्या फाईलची भिती दाखवली

## आमदार रोहित पवार यांनी भारतीय जनता पक्षावर केली टीका

। सोलापूर । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते एकनाथ खडसे आता पुन्हा भाजपात जाणार असल्याच्या चर्चा राजकीय वर्तुळात आहेत. गेल्या काही दिवसांपासून एकनाथ खडसे हे भाजपात जाणार असल्याचे बोलले जाते. यावर अखेर एकनाथ खडसे यांनी माध्यमांशी बोलताना प्रतिक्रिया दिली.**



"केंद्रीय नेतृत्वाशी चर्चा करून ते सांगतील तेव्हा मी दिल्लीत जाऊन भाजपामध्ये प्रवेश करणार आहे", असे खडसे म्हणाले. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाला मोठा धक्का बसण्याची शक्यता आहे. या सर्व घडामोडी संदर्भात आमदार रोहित पवार यांनी प्रतिक्रिया देत एकनाथ खडसे यांना भाजपाने खोट्या फाईलची भिती दाखवली असेल, असा टोला लगावला. तसेच भाजपा खोट्या फाईल पुढे आणून भिती दाखवत असल्याचा आरोप त्यांनी केला.उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह त्यांच्याबरोबर गेलेले नऊ-दहा मोठे नेते, ज्यांना आता पदे मिळालेली आहेत. त्यांनाही ब्लॅकमेल करण्यात आले होते. त्यांच्या फाईल काढल्या गेल्या होत्या. त्यामुळे जेलमध्ये जाण्यापेक्षा भाजपा बरा, या अनुषंगाने ते भाजपाबरोबर गेले. आता एकनाथ खडसे यांच्याबाबतही खोट्या पद्धतीचे ब्लॅकमेल केले असावे, खोट्या फाईल पुढे आणून जसे दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना तुरुंगात टाकले, तसे जर एकनाथ खडसे यांना तुरुंगामध्ये टाकले असते तर त्यांच्या आरोग्याची परिस्थिती खालावली असती. त्या काळजीपोटी त्यांनी तो निर्णय घेण्याचा विचार केला असावा", असे रोहित पवार म्हणाले.गेल्या काही दिवसांपासून एकनाथ खडसे भाजपात जाणार असल्याच्या चर्चा सुरु होत्या. यातच त्यांनी दिल्लीत जाऊन गृहमंत्री अमित शाह, भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा यांची भेट घेतली होती. या भेटीचे फोटोही समोर आले होते. त्यामुळे एकनाथ खडसे हे पुन्हा एकदा भाजपात सामील होतील, अशा चर्चांनी जोर धरला होता. यावर अखेर एकनाथ खडसे यांनीच मौन सोडत 'मी लवकरच भाजपामध्ये प्रवेश करणार आहे', असे सांगितले.

### एकनाथ खडसेंची दिल्लीवारी

» राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाबरोबरच राहणार असल्याचे सांगितले आहे. याबाबत त्यांनी एक्सवर एक पोस्ट केली आहे. त्यामध्ये रोहिणी खडसे या म्हणाल्या, "मी राष्ट्रवादी महिला कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची प्रदेशाध्यक्ष म्हणून काम करत आहे. मी याच पक्षात असून भविष्यातदेखील याच पक्षात राहणार आहे", असे रोहिणी खडसे यांनी म्हटले आहे.जळगाव जिल्ह्यात एकनाथ खडसे आणि गिरीश महाजन यांचं विळ्या-भोपळ्याचं नातं आहे. त्यामुळे खडसेंना भाजप प्रवेश महाजनांना किती रुचतो हे पाहावं लागेल.

# राहुल गांधी राजकारणातले धोनी!

## राजकारणात कधीकाळी काँग्रेसचं वर्चस्व होतं : राजनाथ सिंह

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर देशभरात राजकीय आरोप-प्रत्यारोप, टीका-टिप्पणी या गोष्टींची चर्चा पाहायला मिळत आहे. सत्ताधारी आणि विरोधक यांच्यामध्ये निवडणूक प्रचाराच्या निमित्ताने तुफान कलगीतुरा रंगल्याचंही दिसून येत आहे. एकमेकांवर राजकीय कुरघोडी करण्याच्या प्रयत्नात समोरच्या बाजूला असणाऱ्या नेत्याला लक्ष्य करण्याची एकही संधी नेतेमंडळी सोडत नाहीत. लोकसभा निवडणुकीतील पहिल्या टप्प्याच्या मतदानाला आता अवघे दोन आठवडे शिल्लक असताना हा प्रचाराचा जोर वाढला आहे. त्यातच केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी केलेलं एक विधान सध्या चर्चेत आलं आहे.**





केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी शनिवारी मध्य प्रदेशच्या सिधी जिल्ह्यात जाहीर प्रचारसभा घेतली. यावेळी त्यांनी काँग्रेस पक्षावर परखड शब्दांत टीका केली. त्याचवेळी त्यांनी राहुल गांधींनाही शेलक्या शब्दांमध्ये लक्ष्य केलं. राहुल गांधींमुळे काँग्रेस देशातून संपली, असा थेट दावाच राजनाथ सिंह यांनी यावेळी बोलताना केला. त्याचवेळी त्यांनी राहुल गांधींची तुलना भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार महेंद्र सिंह धोनी याच्याशी केल्यामुळे त्यांच्या या विधानावरून चर्चा रंगू लागली आहे.एकेकाळी देशभर वर्चस्व असणारी काँग्रेस आता संपली आहे, असा दावा त्यांनी केला. "काँग्रेस देशभरात संपली आहे. भारताच्या राजकारणात कधीकाळी ज्या काँग्रेसचं पूर्णपणे वर्चस्व होतं, भारतातील बहुतांश राज्यांमध्ये ज्या काँग्रेसची सरकारे होती, ती काँग्रेस आता संपली आहे. अगदी मोजक्या लहान लहान राज्यांमध्ये काँग्रेसची सरकारं उरली आहेत", असं राजनाथ सिंह म्हणाले. यावेळी राजनाथ सिंह यांनी राहुल गांधींना लक्ष्य करण्यासाठी महेंद्र सिंह धोनीच्या नावाचा उल्लेख केला. "मी कधीकधी विचार करतो की काँग्रेसचं असं का झालं असावं? त्यातून मी एका निष्कर्षावर पोहोचलो आहे. क्रिकेटमध्ये सर्वात नावाजलेला फिनीशर आहे महेंद्रसिंह धोनी. मग भारताच्या राजकारणातला सर्वात अव्वल फिनिशर कोण आहे असं कुणी मला विचारलं, तर मी म्हणेन राहुल गांधी", असा खोचक टोला यावेळी राजनाथ सिंह यांनी लगावला. यावेळी देशाच्या संरक्षण मंत्रीपदाची जबाबदारी असणारे राजनाथ सिंह यांनी दहशतवादाविषयीही भाष्य केलं. "आम्हाला आमच्या शेजारी देशांशी सौहार्दपूर्ण संबंध ठेवायचे आहेत. कारण माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी नेहमी म्हणायचे की आपण आपले मित्र बदलू शकतो, पण शेजारी बदलू शकत नाही. आम्ही हे तत्व नेहमी पाळतो. पण जर कुणी भारतात दहशतवाद पसरवण्याचा प्रयत्न करत असेल, तर त्याला सडेतोड उत्तर दिलं जाईल", असा इशारा त्यांनी यावेळी दिला. केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी शनिवारी मध्य प्रदेशच्या सिधी जिल्ह्यात जाहीर प्रचारसभा घेतली. यावेळी त्यांनी काँग्रेस पक्षावर परखड शब्दांत टीका केली. त्याचवेळी त्यांनी राहुल गांधींनाही शेलक्या शब्दांमध्ये लक्ष्य केलं. राहुल गांधींमुळे काँग्रेस देशातून संपली, असा थेट दावाच राजनाथ सिंह यांनी यावेळी बोलताना केला. त्याचवेळी त्यांनी राहुल गांधींची तुलना भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार महेंद्र सिंह धोनी याच्याशी केल्यामुळे त्यांच्या या विधानावरून चर्चा रंगू लागली आहे.एकेकाळी देशभर वर्चस्व असणारी काँग्रेस आता संपली आहे, असा दावा त्यांनी केला. "काँग्रेस देशभरात संपली आहे.

### सडेतोड उत्तर दिलं जाईल

» भारताच्या राजकारणात कधीकाळी ज्या काँग्रेसचं पूर्णपणे वर्चस्व होतं, भारतातील बहुतांश राज्यांमध्ये ज्या काँग्रेसची सरकारे होती, ती काँग्रेस आता संपली आहे. अगदी मोजक्या लहान लहान राज्यांमध्ये काँग्रेसची सरकारं उरली आहेत", असं राजनाथ सिंह म्हणाले. यावेळी राजनाथ सिंह यांनी राहुल गांधींना लक्ष्य करण्यासाठी महेंद्र सिंह धोनीच्या नावाचा उल्लेख केला. "मी कधीकधी विचार करतो की काँग्रेसचं असं का झालं असावं? त्यातून मी एका निष्कर्षावर पोहोचलो आहे. क्रिकेटमध्ये सर्वात नावाजलेला फिनीशर आहे महेंद्रसिंह धोनी. मग भारताच्या राजकारणातला सर्वात अव्वल फिनिशर कोण आहे असं कुणी मला विचारलं, तर मी म्हणेन राहुल गांधी", असा खोचक टोला यावेळी राजनाथ सिंह यांनी लगावला.यावेळी देशाच्या संरक्षण मंत्रीपदाची जबाबदारी असणारे राजनाथ सिंह यांनी दहशतवादाविषयीही भाष्य केलं. "आम्हाला आमच्या शेजारी देशांशी सौहार्दपूर्ण संबंध ठेवायचे आहेत. कारण माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी नेहमी म्हणायचे की आपण आपले मित्र बदलू शकतो, पण शेजारी बदलू शकत नाही. आम्ही हे तत्व नेहमी पाळतो. पण जर कुणी भारतात दहशतवाद पसरवण्याचा प्रयत्न करत असेल, तर त्याला सडेतोड उत्तर दिलं जाईल.

# कर्नाटकात घराणेशाही काँग्रेससाठी अडचणीची?

## कर्नाटकात आठ मंत्र्यांच्या घरातच उमेदवारी वाटण्यात आली

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**कर्नाटकचे काँग्रेससाठी वेगळे महत्व आहे. पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांचे मूळ राज्य. पक्षाची सत्ता असलेले एकमेव मोठे राज्य. अशा कर्नाटकातून काँग्रेसला चांगल्या यशाची अपेक्षा असणे स्वाभाविक. यासाठी पक्षाचे ज्येष्ठ नेते वा मंत्र्यांना लोकसभेच्या रिंगणात उतरविण्याची योजना होती. पण बंगळूरुतील ऐहिक सुखाचा त्याग करून कोणीही दिल्लीत जाण्यास तयार नव्हते. शेवटी मुलगा, मुलगी, जावई, सुनांचा पर्याय काढण्यात आला.**

इंडिया आघाडीला सत्ता मिळालीच तर पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांचे नाव पंतप्रधानपदासाठी घेतले जात आहे. दोन दशकांपूर्वी कर्नाटकातील २० खासदारांच्या जोरावर जनता दलाचे देवेगौडा पंतप्रधान झाले होते.कर्नाटकात चांगले यश मिळावे यासाठी पक्षाचे मंत्री व ज्येष्ठ नेत्यांना लोकसभेची उमेदवारी देण्याची योजना होती. पक्षांतर्गत विरोधकांना दिल्लीत पाठविण्यासाठी मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्यासाठी ही सुवर्णसंधीच होती. आमच्या घरात उमेदवारी द्या, जागा निवडून आणतो, असा शब्द बहुतांशी मंत्र्यांनी दिला. यातूनच आठ मंत्र्यांच्या घरातच उमेदवारी वाटण्यात आली. कोलार मतदारसंघात आपल्या जावयाला



उमेदवारी द्यावी म्हणून मंत्री मुनीयप्पा आडून बसले. त्यावरून काँग्रेसच्या पाच आमदारांनी थेट राजीनाम्याचा इशारा दिल्याने पर्याय म्हणून दुसऱ्यालाच उमेदवारी देण्यात आली. उमेदवारी वाटताना घराणेशाहीला प्राधान्य देण्यात आल्याने काँग्रेसच्या स्थानिक नेतेमंडळींमध्ये मोठ्या प्रमाणावर नाराजी आहे. स्वत: खरगे यांनीच घराणेशाहीला प्राधान्य दिल्याने अन्य नेत्यांना आयतीच संधी मिळाली. खरगे यांनी निवडणूक लढवावी, अशी मागणी करण्यात आली होती. पण गेल्या निवडणुकीत गुलबर्गा या बालेकिल्ल्यात पराभव स्वीकारावा लागल्यानेच बहुधा खरगे यांनी राज्यसभाच पसंत केलेली दिसते. खरगे यांनी गुलबर्गा या मतदारसंघात राधाकृष्ण डोड्डमणी या आपल्या जावयालाच उमेदवारी दिली. राज्यसभेचे माजी उपाध्यक्ष रेहमान खान यांचे पुत्र, बंगळूरुच्या माजी महापौरांचे पुत्र अशा विविध घराणेशाहीतील नेत्यांना उमेदवारी देण्यात आली आहे. काँग्रेसच्या या घराणेशाहीवर भाजपने टीका केली आहे. पण भाजपचे प्रदेशाध्यक्षच माजी मुख्यमंत्री येडियुरप्पा यांचे पुत्र आहेत.

### माजी मुख्यमंत्री सदानंद गौडा नाराज

» गेल्या वर्षी विधानसभा निवडणुकीतील पराभवातून भाजप अजूनही सावरलेली नाही. प्रदेशाध्यक्षपदी येडियुरप्पा यांच्या मुलाची निवड केल्याने पक्ष संघटनेवर त्यांचाच पगडा आहे. देशाची घटना बदलण्याची भाषा करणारे किनारपट्टी भागातील उत्तर कन्नडा मतदारसंघाचे सहा वेळा प्रतिनिधित्व केलेल्या अनंतकुमार हेगडे यांना भाजपने उमेदवारी नाकारली आहे. येडियुरप्पा यांच्या निकटवर्तीय केंद्रीय राज्यमंत्री शोभा करंदलाजे यांना बंगळूरु उत्तर मतदारसंघातून उमेदवारी दिल्याने या मतदारसंघाचे खासदार व माजी मुख्यमंत्री सदानंद गौडा नाराज झाले आहेत.

# अदिती राव हैदरीशी सिद्धार्थ कधी करणार लग्न?

बॉलीवूडमध्ये सध्या लगीनघाई सुरू असल्याचं पाहायला मिळत आहे. गेल्या महिन्यात २७ मार्च रोजी अभिनेत्री अदिती राव हैदरीने अभिनेता सिद्धार्थशी गुपचूप साखरपुडा उरकला. गेल्या काही दिवसांपासून या जोडप्याने लग्न केल्याच्या चर्चांना उधाण आलं होतं. परंतु, इन्स्टाग्राम पोस्ट शेअर करत सर्व चर्चांना पूर्णविराम देत तेलंगणातील वानापर्थी जिल्ह्यातील श्रीरंगापुरम इथं साखरपुडा केल्याचं अदितीने जाहीर केलं. सिद्धार्थ-अदितीचा गुपचूप साखरपुडा पार पडल्यावर आता हे जोडपं लग्न केव्हा करणार याची चाहते प्रतीक्षा करत आहेत. नुकत्याच पार पडलेल्या 'गलाट्टा गोल्डन स्टार्स' सोहळ्यात सिद्धार्थने लग्नाबद्दल भाष्य केलं आहे. लग्न केव्हा करणार या प्रश्नावर मौन सोडत अभिनेता म्हणाला, “अनेक लोकांचा असा समज झालाय की, आम्ही गुपचूप साखरपुडा केला. पण, फक्त कुटुंबाबरोबर एखाद्या कार्यक्रमाचं आयोजन करणं आणि गुपचूप एखादा कार्यक्रम करणं यात खूप मोठा फरक आहे. ज्या लोकांना आम्ही साखरपुड्याला बोलावलं नाही त्यांना असं वाटतं की, यामागे नक्की काहीतरी गुपित आहे. परंतु, जे लोक तिथे उपस्थित होते त्यांना माहितीये की, हा कार्यक्रम खूप प्रायव्हेट होता. आमचे



जवळचे कुटुंबीय आणि काही नातेवाईक त्यावेळी उपस्थित होते.”सिद्धार्थ लग्नाबद्दल म्हणाला, “अदितीने मला होकार देण्यासाठी किती वेळ घेतला वगैरे हे प्रश्न आता दूर राहिले. मी खूप दिवस विचार करत होतो की, ही मला होकार कळवेल का? की नाही सांगेल. पण, सुदैवाने ती हो म्हणाली. आता आम्ही लग्न केव्हा करणार याचा निर्णय कुटुंबातील वरिष्ठ लोक घेतील. त्यांचा निर्णय आम्हा दोघांसाठी महत्त्वाचा असेल. ही काही चित्रपटाच्या शूटिंगची तारीख नाही की, मी ठरवेन तसं होईल. मोठ्या लोकांमध्ये चर्चा झाल्यावर तेच निर्णय घेतील.”‘महा समुद्रम’ नावाच्या चित्रपटात अदिती व सिद्धार्थने एकत्र काम केलं होतं. या चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान आदिती व सिद्धार्थ एकमेकांच्या प्रेमात पडले आणि रिलेशनशिपमध्ये आले. आता लवकरच ही जोडी विवाहबंधनात अडकणार आहे. दरम्यान, सिद्धार्थ लवकरच ‘इंडियन २’ चित्रपटात झळकणार आहे.

## सुकुमारनने केलं नेपोटीझमवर भाष्य

‘नेपोटीझम’ हा गेल्या काही वर्षांपासूनचा वादग्रस्त मुद्दा आहे. बॉलिवूड इंडस्ट्रीत याबाबत अनेक वादविवाद पाहायला मिळतात पण इतर सिनेइंडस्ट्रीमध्ये या गोष्टीला तितकंस महत्त्व दिलं जात नाही. बॉलिवूड इतकीच मोठी असणाऱ्या साऊथ इंडस्ट्रीमध्येही अनेक कलाकार फिल्मी कुटूंबातून आलेले आहेत. याबाबत साऊथ सुपरस्टार पृथ्वीराज सकुमारनने मॅशेबल इंडियाशी संवाद साधला आणि नेपोटीझमबाबत त्याच मत व्यक्त केलं.पृथ्वीराज त्याचा मित्र दुलकर सलमानबाबत बोलत असताना त्याने नेपोटीझमविषयी भाष्य केलं. तो म्हणाला,”मी ही नेपोकिड आहे हे मी मान्य करतो आणि हे सत्य आहे. मी फक्त आता माझ्याविषयी सांगतो. मी ही या इंडस्ट्रीत फक्त माझ्या नावामुळे आलो. मी हे स्वीकारलं आहे आहे कि, मला फक्त माझ्या नावामुळे या इंडस्ट्रीत प्रवेश मिळाला.

## करीनाचीक्रेझ आजही कायम

बॉलिवूडची ग्लॅमगर्ल बेबो म्हणजेच करीना कपूरची क्रेझ आजही कायम आहे. नुकताच तिचा क्रू हा सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीस आला. तिचा हा सिनेमा चांगलाच गाजतोय. याचदरम्यान तिने तिच्या चाहत्यांशी संवाद साधला. यावेळी तिने दिलेल्या उत्तरांनी सगळ्यांचं लक्ष वेधून घेतलं.करीनाने तिच्या चाहत्यांशी इंस्टाग्रामवरील आस्क मी नाऊ या फिचरद्वारे संवाद साधला. यावेळी तिच्या एका चाहत्याने तिला ती लहानपणी कोणतं कार्टून बघायची असा प्रश्न विचारला त्यावर करिनाने ‘टॉम एन जेरी’ कार्टूनचा फोटो शेअर केला आणि “टीम आणि जेह प्रमाणे मी सुद्धा टॉम एन जेरी बघायचे” असं उत्तर दिलं. एका चाहत्याने तिला तिचं आवडीचं जेवण काय आहे असं विचारलं त्यावर तिने,”खूप मोठी लिस्ट आहे जसं कि पिझ्झा, खिचडी. कढी चावल, बिर्याणी आणि बरंच काही...” असं उत्तर दिलं.तर एकाने तिला तू जेव्हा ‘सोना कितना सोना है’ हे गाणं गायलंस तेव्हा लोलोची (करिष्मा) रिॲक्शन कशी होती? असा प्रश्न केला त्यावर तिने,”तिला खूप आवडलं. ”इतकंच नाही तर करीनाने यावेळी तिच्या आगामी प्रोजेक्टबाबतही महत्त्वाचा खुलासा केला.



## ‘मेट गाला 2024’ ला दीपिका राहणार गैरहजर

मॉम टू बी’ दीपिका पादुकोण सध्या सतत चर्चेत आहे. तिच्या सोशल मीडिया पोस्ट, वेगवेगळ्या कार्यक्रमांना ती लावत असलेली हजेरी यावर तिचे चाहते बारीक नजर ठेवून असून सतत तिच्याविषयीचे अपडेट्स जाणून घेण्यास उत्सुक असतात. आपल्या युनिक फॅशन सेन्समुळे चर्चेत राहणाऱ्या दीपिकाच्या चाहत्यांसाठी मात्र एक निराशाजनक बातमी आहे. दीपिका यंदाच्या ‘मेट गाला 2024’ या कार्यक्रमाला हजेरी लावणार नाहीये. गेल्या काही वर्षांपासून दीपिका या कार्यक्रमाला सातत्याने हजेरी लावली आहे. पण यंदा तिच्या पूर्वनियोजित कामांमुळे ती यावेळी मेट गालाला उपस्थित राहू शकणार नसल्याचं म्हंटलं जातंय.सूत्रांच्या म्हणण्यानुसार, दीपिकाने आधीच तिच्या तारखा सिनेमाच्या शूटसाठी दिल्या आहेत आणि ती या काळात तिच्या आगामी सिनेमाच्या शूटिंगमध्ये बिझी असणार आहे. सूत्रांनी इंडिया डॉट कॉम या वेबसाईटला दिलेली मुलाखतीत सांगितलं कि,”दीपिका सातत्याने मेट गालाच्या रेड कार्पेटवर हजेरी लावत आलीये. त्यामुळे यावर्षीही तिचे चाहते तिला रेड कार्पेटवर पाहण्यास उत्सुक असणं स्वाभाविक आहे. ती जागतिक स्तराची ब्रॅंड ॲम्बेसिडर असलेल्या भारतीय अभिनेत्रींपैकी एक आहे. दीपिका सध्या सिंघम ३ या सिनेमाच्या शूटमध्ये बिझी आहे आणि हा सिनेमा या वर्षी प्रदर्शित होणार आहे. यासोबतच तिचा कल्की २८९८ एडी हा सिनेमा या मे महिन्यात रिलीज होतो आहे. त्यामुळे तिचं सगळं वेळापत्रक मेट गालाच्या तारखांशी जुळत नाहीये. त्यामुळे ती या वर्षीच्या कार्यक्रमाला हजर राहू शकत नाही .” असं स्पष्टीकरण त्यांनी यावेळी दिलं. तसेच दीपिका प्रेग्नेंट असून सप्टेंबरमध्ये तिच्या बाळाचा जन्म होणार असल्याचं म्हंटलं जातंय. त्यामुळे सध्या ती जास्तीत जास्त वेळ तिचे आगामी प्रोजेक्ट्स पूर्ण करण्यात देत आहे. सोशल मीडियावर तिने तिच्या प्रेग्नेंसीची बातमी शेअर करताच तिच्या चाहत्यांना खूप आनंद झाला होता.’मेट गाला’ हा कार्यक्रम हा न्यूयॉर्कमधील कॉस्च्युम इन्स्टिट्यूटतर्फे दरवर्षी मे महिन्याच्या पहिल्या सोमवारी आयोजित केला जातो.

## रश्मिका मंदानाच्या बहिणीला व्हायचेय अभिनेत्री

दाक्षिणात्य इंडस्ट्रीबरोबरच बॉलीवूड सिनेसृष्टीतही आपल्या अभिनयानं प्रेक्षकांना भुरळ घालणारी आणि नॅशनल क्रश म्हणून ओळखली जाणारी अभिनेत्री म्हणजेच रश्मिका मंदाना. २०२३ रोजी प्रदर्शित झालेल्या ‘ॲनिमल’ चित्रपटामुळे ती अनेकदा चर्चेत आली. रश्मिकाला नेहमीच तिचं वैयक्तिक आयुष्य खासगी ठेवायला आवडतं. खूप कमी जणांना माहीत असेल की, रश्मिकाला एक लहान बहीण आहे आणि त्यांच्यात १६ वर्षांचं अंतर आहे. रश्मिकाची बहीण आता १० वर्षांची आहे.‘नो फिल्टर नेहा’ या नेहा धुपियाच्या शोला दिलेल्या मुलाखतीत रश्मिकानं तिच्या आणि बहिणीच्या नात्याबद्दल सांगितलं. रश्मिका म्हणाली, “तिला चित्रपट खूप आवडतात.जेव्हा मी चित्रपटांमध्ये रडते तेव्हा मला बघून ती तीन-चार तास रडते. तिला असं वाटतं की, माझी बहीण रडतेय, तिला त्रास होतोय. जर चित्रपटात मला कोणी ओरडलं, तर तिला ती व्यक्ती खऱ्या आयुष्यात आवडत नाही. ती त्याचा तिरस्कार करते. तिला असं वाटतं की, ही व्यक्ती माझ्या बहिणीला कशी काय त्रास देऊ शकते.”ती नेहमी म्हणत असते की, मला अभिनेत्री व्हायचंय. जेव्हा मी घरी जाते आणि कोणी घरी आलं आणि माझ्याबरोबर सेल्फी काढला, तर तीही त्या सेल्फीमध्ये येते आणि मस्त स्माइल वगैरे करते. मला ते सगळं क्यूट वाटतं. पण तिला हे माहीत नाही की, मी कधी उठते, मी किती व्यायाम करते, मी स्किन क्लिनिकला जाते तेव्हा मी काय करते. हे सगळं तिला अजून माहीत नाही. ती मला एक बहीण म्हणून पूर्णपणे ओळखते. तर हे सगळं पुढे जाऊन नक्की कसं असेल हे तिला अजून माहीत नाही. ती माझ्या लहान मुलीसारखीच आहे,” असं रश्मिका म्हणाली.



# गुकेशचा प्रज्ञानंदवर विजय!

## विदितचा नाकामुराला धक्का; हम्पीची सलग दुसरी बरोबरी

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**विदित गुजराथीने आपली आणि भारतीय बुद्धिबळाची ताकद अधोरेखित करताना 'कॅन्डिडेट्स' म्हणजेच आव्हानवीरांच्या बुद्धिबळ स्पर्धेत दुसऱ्याच फेरीत जागतिक क्रमवारीत तिसऱ्या स्थानावर असलेल्या अमेरिकेच्या हिकारू नाकामुराला पराभवाचा धक्का दिला. नाकामुराकडे संभाव्य विजेता म्हणून पाहिले जात आहे. त्यामुळे विदितचा हा विजय खूप मोठा मानला जात आहे.**



दुसरीकडे, दोन भारतीय ग्रँडमास्टर बुद्धिबळपटूंमध्ये झालेल्या लढतीत डी. गुकेशने आर. प्रज्ञानंदला पराभूत केले. त्याच वेळी महिलांमध्ये आर. वैशालीला पराभवाचा सामना करावा लागला, तर कोनेरू हम्पीला सलग दुसऱ्या बरोबरीवर समाधान मानावे लागले. खुल्या विभागात पहिल्या फेरीतील चारही लढती बरोबरीत राहिल्या होत्या. दुसऱ्या फेरीत मात्र चारही लढती निर्णायक ठरल्या. अग्रमानांकित फॅबियानो कारुआनाने निजात अबासोववर अगदी सहज मात केली. इयान नेपेम्निप्रयाशीने फ्रान्सच्या अलिरेझा फिरुझाचा पराभव केला. खुल्या विभागात विदित, कारुआना, नेपोम्निप्रयाशी आणि गुकेश प्रत्येकी १.५ गुणांसह संयुक्त आघाडीवर आहेत.महिला विभागात वैशालीला चीनच्या टॅन झोंगीविरुद्ध पराभवाचा सामना करावा लागला. रशियाच्या अॅलेक्झांड्रा गोर्याचकिनाने अॅना मुझिचुकला पराभूत केले. अन्य लढतीत हम्पीने सलग दुसऱ्या लढतीत बरोबरी मान्य केली. तिला कॅटेरिना लायनोने रोखले. नुरग्युल सलिमोवा आणि ले टिंगजी यांच्यातील लढत बरोबरीत सुटली. महिला विभागात टॅन दोन गुणांसह आघाडीवर आहे.खुल्या विभागात नाकामुराविरुद्ध विदितची कामगिरी लक्षवेधी ठरली. सलग दुसऱ्या डावात काळ्या मोहऱ्यांसह खेळताना विदितने या वेळी बर्लिन पद्धतीला पसंती दिली. विदितच्या काहीशा चकित करणाऱ्या चालींनी नाकामुराला दडपणाखाली आणले. अवघ्या तीन चालींनंतर विदितने घोड्याचे बलिदान देताना नाकामुराला गोंधळात टाकले.

> विदितसाठी हा खूप मोठा विजय होता. पारंपरिक (क्लासिकल) प्रकारात नाकामुरा यापूर्वीच्या ४७ सामन्यांत अपराजित राहिला होता. त्याला मॅग्नस कार्लसनही पराभूत करू शकला नव्हता. तसेच जलद आणि अतिजलद प्रकाराच्या बुद्धिबळात नाकामुराने यापूर्वी विदितचा अनेकदा पराभव केला होता. नाकामुराने भारतात येऊन टाटा स्टील स्पर्धेतही विदितवर मात केली होती. त्यामुळे 'कॅन्डिडेट्स'मधील या सामन्यात नाकामुरा थोडा गाफील राहिला. याचा विदितने पुरेपूर फायदा घेतला. नाकामुराने दिलेली संधी विदितने सोडली नाही. त्यामुळे त्याचे कौतुक झाले पाहिजे.
>
> **– रघुनंदन गोखले,** बुद्धिबळ प्रशिक्षक

त्यानंतर विदितने आक्रमक चाली रचत अवघ्या २९व्या चालीला नाकामुराला पराभूत केले. 'उत्तम खेळलास,' असे म्हणत लढतीनंतर नाकामुराने विदितच्या कामगिरीचे कौतुक केले.अन्य लढतीत, गुकेशविरुद्ध प्रज्ञानंदने कॅटलान पद्धतीने सुरुवात केली व पटावरील स्थिती क्लिष्ट केली. गुकेशला योग्य चालींसाठी विचार करावा लागत होता. मात्र, काही चालींनंतर तो स्थिरावला. त्याच वेळी प्रज्ञानंदकडून चूक झाली व याचा फायदा घेत गुकेशने ३३ चालींत विजय मिळवला.खुला विभाग : इयान नेपोम्निप्रयाशी विजयी वि. अलिरेझा फिरुझा, हिकारू नाकामुरा पराभूत वि. विदित गुजराथी, फॅबियानो कारुआना विजयी वि. निजात अबासोव, आर. प्रज्ञानंद पराभूत वि. डी. गुकेश. महिला : टॅन झोंगी विजयी वि. आर. वैशाली, कॅटेरिना लायनो बरोबरी वि. कोनेरू हम्पी, नुरग्युल सलिमोवा बरोबरी वि. ले टिंगजी, अलेक्झांड्रा गोर्याचकिना विजयी वि. अॅना मुझिचुक.नाकामुराकडे संभाव्य विजेता म्हणून पाहिले जात आहे. त्यामुळे विदितचा हा विजय खूप मोठा मानला जात आहे.

# मुंबई इंडियन्सने उघडले विजयाचे खाते

## ट्रिस्टन स्टब्सची 71 धावांची खेळी ठरली व्यर्थ; दिल्लीचा 29 धावांनी पराभव

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**आयपीएल २०२४ मधील २०वा सामना मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर पार पडला. या सामन्यात मुंबई इंडियन्स आणि दिल्ली कॅपिटल्स आमनेसामने आले होते, ज्यामध्ये मुंबई इंडियन्सने दिल्ली कॅपिटल्सवर २९ धावांनी मात करत यंदाच्या हंगामातील आपला विजय नोंदवला. त्याचबरोबर आपल्या गुणांचे खातेही उघडले. या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना मुंबईने रोमारियो शेफर्डच्या २० व्या षटकातील वादळी खेळीच्या जोरावर दिल्लीला २३५ धावांचे लक्ष्य दिले होते. मात्र, प्रत्युत्तरात दिल्लीचा संघ २० षटकांत ८ बाद २०५ धावाच करु शकला.**




लक्ष्याचा पाठलाग करताना दिल्लीकडून पृथ्वी शॉने ४० चेंडूत ६६ धावांची खेळी केली, तर अभिषेक पोरेल (४१) आणि ट्रिस्टन स्टब्सची महत्त्वपूर्ण खेळीही संघाला विजयापर्यंत नेऊ शकली नाही. ट्रिस्टन स्टब्सने २५ चेंडूत ७१ धावांची नाबाद खेळी खेळली. १५ षटकांनंतर दिल्ली कॅपिटल्सची धावसंख्या ३ गड्यांच्या मोबदल्यात १४४ धावा होती आणि त्यांना विजयासाठी पुढील ५ षटकांत ९१ धावा करायच्या होत्या. १६ व्या षटकात केवळ ९ धावा आल्या आणि ऋषभ पंतच्या विकेटमुळे दिल्ली कॅपिटल्स बॅकफूटवर गेली. पण ट्रिस्टन स्टब्स अजूनही क्रीजवर होता आणि परिस्थिती अशी होती की डीसीला शेवटच्या ३ षटकात ६३ धावा हव्या होत्या.जसप्रीत बुमराहने १७ व्या षटकात फक्त ८ धावा दिल्या, त्यामुळे एमआयचा विजय जवळपास निश्चित झाला.

### पृथ्वी शॉनची 66 धावांची खेळी

आयपीएल २०२४ मधील २०वा सामना मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर पार पडला. या सामन्यात मुंबई इंडियन्स आणि दिल्ली कॅपिटल्स आमनेसामने आले होते, ज्यामध्ये मुंबई इंडियन्सने दिल्ली कॅपिटल्सवर २९ धावांनी मात करत यंदाच्या हंगामातील आपला विजय नोंदवला. त्याचबरोबर आपल्या गुणांचे खातेही उघडले. या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना मुंबईने रोमारियो शेफर्डच्या २० व्या षटकातील वादळी खेळीच्या जोरावर दिल्लीला २३५ धावांचे लक्ष्य दिले होते.

कारण दिल्लीला शेवटच्या १२ चेंडूत ५५ धावा करायच्या होत्या. शेवटच्या दोन षटकांत मुंबईच्या गोलंदाजांनी सामन्यावर नियंत्रण ठेवले होते, त्यामुळे डीसीला २९ धावांनी पराभवाला सामोरे जावे लागले. अखेरच्या षटकात जेराल्ड कोएत्झीने दिल्लीच्या ३ फलंदाजांना पॅव्हेलियनमध्ये पाठवून आपल्या संघाच्या विजयावर शिक्कामोर्तब केला. नाणेफेक हारल्यानंतर प्रथम फलंदाजी करताना मुंबईने २० षटकांत ५ गडी गमावून २३४ धावा केल्या. एके काळी मुंबईची धावसंख्या १७ षटकांत ४ गडी बाद १६७ धावा होती. यानंतर डेथ ओव्हर्समध्ये टीम डेव्हिड आणि रोमारियो शेफर्ड यांच्या तुफानी फलंदाजीमुळे मुंबईला एवढी मोठी धावसंख्या गाठता आली. मुंबईने शेवटच्या पाच षटकात ९६ धावा केल्या. रोमारियो शेफर्डने एनरिक नॉर्टजेच्या २०व्या षटकात ३२ धावा काढल्या.